अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । सोमवार, दि. ३ जून २०२४ । वर्ष : २२ वे अंक : २४४ वा किंमत : ५ रुपये पाने १२

## वेस्ट इंडिजचा टी-२० वर्ल्ड कपमध्ये दमदार विजय

**प्रोव्हिडन्स** : यजमान वेस्ट इंडिजच्या संघाने टी-२० वर्ल्ड कपची विजयाने सुरुवात केली आहे. वेस्ट इंडिजच्या संघाने पहिल्यात सामन्यात पापुआ न्यू गिनी संघावर ५ विकेट्स राखून दमदार विजय साकारला आणि आपल्या अभियानाची चांगली सुरुवात केली. पापुआ न्यू गिनिआ संघाने १३६ धावांपर्यंत मजल मारली होती. या आव्हानाचा यशस्वीपणे वेस्ट इंडिजने पाठलाग केल्याचे पाहायला मिळाले. वेस्ट इंडिजसाठी रॉस्टन चेस यावेळी विजयाचा शिल्पकार ठरला. कारण वेस्ट इंडिजची संघ ५ बाद ९७ अशी बिकट अवस्था झाली होती. पण चेसने यावेळी २७ चेंडूंत चार चौकार आणि दोन षटकारांच्या जोरावर नाबाद ४२ धावांची खेळी साकारली आणि संघाच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. वेस्ट इंडिजने सुरुवातीला अचूक आणि भेदक मारा केला. त्यामुळे वेस्ट इंडिजला पापुआ न्यू गिनी संघाच्या धावसंख्येला वेसण घालता आली. वेस्ट इंडिजने दुसऱ्याच षटकात टोनी उराला (२) बाद केले आणि पापुआ न्यू गिनी संघाला पहिले यश मिळवून दिले. त्यानंतर तिसऱ्या षटकातही वेस्ट इंडिजने विकेट मिळवली आणि पापुआ न्यू गिनी संघाची २ बाद ७ अशी अवस्था केली. पण त्यानंतर पापुआ न्यू गिनी संघाला सावरले ते सेसे बाऊने. यावेळी बाऊने वेस्ट इंडिजच्या गोलंदाजीचा चांगलाच समाचार घेतला आणि अर्धशतक झळकावले. बाऊने यावेळी ३४ चेंडूंत सहा चौकार आणि एका षटकाराच्या जोरावर ५० धावांची खेळी साकारली. बाऊच्या या खेळीच्या जोरावर पापुआ न्यू गिनी संघाला शतकापर्यंत पोहोचला आले.

(विशेष पान ११)

# अन् युवकावर काळानं झडप घातली...चौघे बुडाले

**रत्नागिरी,पंढरपूर/प्रतिनिधी**

पर्यटनासाठी गेलेल्या चौघांना पोहण्याचा मोह आवरला नाही. समुद्राच्या मोकळ्या पाण्यात मनसोक्त पोहण्याचा आनंद घेण्यासाठी ते चौघेही तरुण पाण्यात उतरले. मात्र खोल पाण्याचा अंदाज लागला नाही. पाण्याचा खोलीसंदर्भातील त्यांनी ठरविलेला अंदाज साफ चुकला. ते चौघेही खोल पाण्यात गेले. याचदरम्यान काळानं झडप घातली. क्रुर नियतीनं आपला खेळ दाखवायला सुरवात केली. पुढं घडलं ते महाभयंकर. पर्यटनातून आंनद मिळविण्यासाठी समुद्रावर जाणं महागात पडलं. ज्यांच्या आयुष्याची दोरी अजून तुटली नव्हती ते वाचले. पण दुसरीकडे काही अवचित घडलं. जे काही दूर्देवी घडलं त्यानं पंढपूर तालुक्यातील इसबावी गावावर अक्षरश: शोककळा पसरली. उजनी जलशयामधील घटना अत्यंत ताजी असतानाच हे घडलं. या घटनेनं 'त्या' समुद्राचा काठ गहिवरला.





**▶ पंढरपूर तालुक्यातील इसबावीवर शोककळा**

**▶ पर्यटनासाठी गेले होते गणपतीपुळ्याला**

त्याचे झाले असे की, पंढरपूर तालुक्यातील इसबावी गावचे अजित धनाजी वाडेकर (वय २५), अजय बबन शिंदे (वय २३), सार्थ दत्तात्रय माने (वय २४) आणि आकाश प्रकाश पाटील (वय२५) असे चार तरूण गणपतीपुळे येथे देवदर्शनासाठी व पर्यटनासाठी गेले होते. या तरूणांनी प्रथम देवदर्शन न करता गणपतीपुळे समुद्राच्या पाण्यात आंघोळीसाठी उतरण्याचा निर्णय घेतला.

समुद्रात पोहण्यासाठी गेलेले चार तरूण बुडाले होते. त्यापैकि तिघांना वाचविण्यात यश आले आहे. तर एका तरूणाचा समुद्रात बुडून मृत्यू झाला. गणपतीपुळे येथील जीवरक्षकांच्या प्रसंगावधानामुळे तियांचे प्राण वाचले आहेत. रविवारी सकाळी ११.३० वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली आहे. सहलीसाठी गेलेले हे युवक पंढरपूरचे होते.

गणपतीपुळे येथील समुद्रात रविवारी सकाळी ११.३० वाजण्याच्या सुमारास चारजण बुडाले होते. त्यातील तीन जणांना वाचवण्यात आले आहे. सोलापूर जिल्ह्यातील अजित धनाजी वाडेकर (वय २५) या तरूणाचा समुद्राच्या पाण्यात बुडून मृत्यू झाला आहे. तर तीन तरूणांना वाचविण्यात स्थानिक जीवरक्षक, व्यावसायिक व गणपतीपुळे पोलिसांना यश आले आहे. गणपतीपुळे येथे रविवारी सकाळी १० वाजता सुमारास सोलापूर जिल्ह्यातील इसबावी या ठिकाणाहून अजित धनाजी वाडेकर (वय २५), अजय बबन शिंदे (वय २३), सार्थ दत्तात्रय माने (वय २४) आणि आकाश प्रकाश पाटील (वय२५) असे चार तरूण गणपतीपुळे येथे देवदर्शनासाठी व पर्यटनासाठी आले होते.

या तरूणांनी प्रथम देवदर्शन न करता गणपतीपुळे समुद्राच्या पाण्यात आंघोळीसाठी उतरण्याचा निर्णय घेतला.

हे चारही तरूण समुद्राच्या पाण्यात उतरले असता त्यांनी खोल पाण्यात जाण्याचा प्रयत्न केला. त्यातील अजित वाडेकर हा खोल समुद्राच्या पाण्यात अडकला. यावेळी अजितला पाण्याबाहेर येता येत नाही, हे लक्षात येताच त्याच्यासह असलेल्या तरूणांनी व समुद्राच्या पाण्यात असलेल्या इतर पर्यटकांनी आरडाओरडा करण्यास सुरुवात केली.

ही बाब किनाऱ्यावरील जीवरक्षक व पोलीस दूरक्षेत्राचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक संदीप साळवी व हेड कॉन्स्टेबल कुणाल चव्हाण यांच्या निदर्शनास आली. त्यांनी ग्रामपंचायतीचे जीवरक्षकांना समुद्राच्या पाण्यात पाठवले.

गणपतीपुळे समुद्रकिनाऱ्यावरील जीवरक्षक अक्षय माने, महेश देवरुखकर, अंजिक्य रामाणी, विशाल निंबरे यांनी आणि गणपतीपुळे समुद्रकिनाऱ्यावरील टिव्ही व्यावसायिक राकेश शिवलकर यांनी समुद्राच्या पाण्यात उड्या घेऊन समुद्राच्या खोल पाण्यात अडकलेल्या तीन तरूणांना पाण्याबाहेर काढले. त्यानंतर अजित वाडेकर ला वाचविण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्याला पाण्याबाहेर काढल्यानंतर तो बेशुद्ध असल्याने जीवरक्षक, स्थानिक व्यावसायिक व पोलिसांच्या मदतीने गणपतीपुळे देवस्थानच्या रुग्णवाहिकेने तातडीने मालगुंड प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी नेण्यात आले.

मालगुंड येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकिय अधिकारी डॉ. मधुरा जाधव यांनी अजितला मृत घोषित केले. या तरुणाचे शवविच्छेदन करून त्याचा मृतदेह त्याच्या कुटुंबिय नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात येणार असल्याची माहिती दूरक्षेत्र पोलिसांकडून देण्यात आली आहे. या घटनेचा अधिक तपास जयगड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक कुलदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली गणपतीपुळे पोलीस दूर क्षेत्राचे पोलीस कर्मचारी करीत आहेत, असे सांगण्यात आले.

### पर्यटकांना आवाहन

दरम्यान, सध्या गणपतीपुळे येथे उन्हाळी पर्यटन हंगाम गर्दीने गजबजत असून विविध ठिकाणांहून आलेले पर्यटक समुद्राच्या पाण्यात आंघोळ करण्यासाठी उतरतात. पर्यटक व भाविकांनी समुद्राच्या खोल पाण्यात आंघोळीसाठी जाऊ नये, असे आवाहन गणपतीपुळे ग्रामपंचायत व गणपतीपुळे- जयगड पोलीस ठाण्याच्या वतीने करण्यात आले आहे. एकूणच गणपतीपुळे येथे मे महिन्याचा उन्हाळी पर्यटन हंगाम चांगल्याप्रकारचा गेला होता. या ठिकाणी गेल्या महिन्याभरात कुठलीही दुर्घटना घडलेली नाही. तसेच समुद्रकिनाऱ्यावरील जलक्रीडा व्यवसाय सुरू असल्याने गणपतीपुळे समुद्रात बुडणाऱ्यांचे प्रमाण कमी झाले होते.

### उजनी घटनेच्या जखमी अजून ओल्या...

उजनी जलाशयात बिचाऱ्या सहाजणांना जलसमाधी मिळाली. जिवाला चटका लावणारी ही घटना अजून ताजी आहे. या घटनेच्या जखमा अजूनही ओल्या आहेत. अशातच गणपतीपुळे इथल्या समुद्रात पंढरपूर तालुक्यातील इसबावीचे चौघे तरुण बुडाल्याची दूर्देवी घटना घडली.

### जलक्रीडा बंद अन् मृत्यूची घटना

गणपतीपुळे समुद्रकिनाऱ्यावरील जलक्रीडा व्यवसाय मे महिन्याच्या अखेरीस बंद झाल्यानंतर अवघ्या सहा दिवसांनी आणि जून महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात समुद्राच्या पाण्यात बुडून मृत्यू होण्याची घटना घडली आहे.

## पोलीस म्हणून लाच मागणाऱ्या तोतयावर गुन्हा

**नातेपुते** : आपण पोलीस अधिकारी तर, दुसऱ्याने अन्न भेसळ अधिकारी असल्याची फोनवरून थाप मारून एका हॉटेलवर कारवाई न करण्यासाठी १५ हजार रुपयाची मागणी केली. याप्रकरणी नातेपुतेच्या पोलिसांनी दोघा भामट्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ही घटना नातेपुते येथील गारवा शिंगणापूर या हॉटेलमध्ये शनिवारी दुपारी घडली.

या संदर्भात गारवा शिंगणापूर हॉटेलचे चालक अशोक मारुती डोंबाळे (रा.नातेपुते) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी कुंदन नामदेव काटकर (रा. नातेपुते) आणि लखन कैलास गायकवाड (रा. भेकराईनगर पुणे) या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे .काल दुपारी १२ वाजेच्या सुमारास कुंदन काटकर याने डोंबाळे यांना आपण पोलीस अधिकारी आहोत तर गायकवाड याने अन्न अधिकारी असल्याचे फोन करून सांगितले. आणि तुमच्या हॉटेलवर कारवाई न करण्यासाठी १५ हजार रुपये द्या, अशी दोघांनी मागणी केली होत. अशी नोंद पोलिसात झाली. हवालदार कदम पुढील तपास करीत आहेत.

## बामणी गावाजवळ कार दुचाकीला धडकली; तिघेजण जागीच ठार

**सांगोला** : सांगोला-पंढरपूर या राज्य मार्गावरील बामणी गावाजवळ कार व मोटारसायकलची समोरासमोर धडक होऊन मोटारसायकली वरील तिघेही जागीच ठार झाल्याची घटना रविवार २ जून रोजी रात्री आठच्या सुमारास घडली.

याबाबत माहिती अशी की कवठेमहांकाळ येथे बिरोबाच्या पालखीचे दर्शन घेण्यासाठी पंढरपूर तालुक्यातील तनाळी येथून माळाप्पा महादेव धनगर (वय २२), धीरू नवापा कोळेकर (वय १७), विष्णू बिरा दिवटे (वय १७) हे तिघेही मोटारसायकलवरून जात असताना सांगोलाहून पंढरपूरकडे भरधाव वेगाने निघालेल्या कारने बामणी हँडसम डेअरी जवळसमोरने धडक दिल्याने मोटारसायकल वरील धनगर दिवटे व कोळेकर हे जागीच ठार झाले. सदर घटना रात्री आठच्या सुमारास घडली धनगर दिवटे कोळेकर हे निपाणी तालुका चिकोडी जिल्हा बेळगाव येथील राहणारे आहेत त्यांच्या मेंढ्या चारण्यासाठी पंढरपूर तालुक्यातील तनाळी येते आपल्या कुटुंबासहित आलेले आहेत ते तिघे दिवसा तेथील शेतकऱ्यांच्या शेतात डाळिंबाच्या छाटणीचे काम करतात तसेच रात्रीचे ही काम करतात त्यांच्याबरोबर त्यांचे नातेवाईक आहेत. कवठेमहांकाळ येथे बिरोबाच्या पालखीचे दर्शन घेण्यासाठी दिवसभर काम करून रात्री आठच्या सुमारास तनाळीतून ते निघाले होते अर्ध्या तासातच त्यांच्यावर काळाचा घाला पडला व त्यात ते मरण पावले.

## सोलापुरातील सराफाला बलात्काराचा गुन्ह्यात अटक

**सोलापूर** : बार डान्सरवर बलात्कार केल्याप्रकरणी सराफ व्यापारी माणिक सुरेश नारायणपेठकर (रा.सोलापूर) याच्याविरुध्द सोलापूर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

यात हकिकत अशी की, पिडीता हि कामानिमित्त फेब्रुवारी २०२४ मध्ये सोलापूर येथे आली होती. त्यावेळी पिडीता हि तिचे भावाला अंगठी खरेदी करिता आरोपीच्या नारायणपेठकर ज्वेलर्स मध्ये गेली होती. त्यावेळी आरोपीने पिडीतेची खासगी माहिती व व कोठून आला आहात अशी माहिती विचारली.त्यावेळी पिडितेने त्यास मी ऑर्केस्टा कलाकार असून काम शोधत असल्याचे सांगितले. त्यावेळी आरोपींने पिडितेस माझी बऱ्याच बार मालकांशी ओळख आहे असे म्हणून पिडीतेसोबत सलगी वाढवली.

पेठकरच्या दुकानातून तिने सोने खरेदी केले. त्याच दिवशी आरोपीने पीडितेस बारमालकाशी ओळख करून देतो असे म्हणून सांयकाळी बार्शी रोड येथे येण्यास सांगितले. त्याठिकाणी बार्शी रोडवरील एका लॉजवर गेली त्याठिकाणी आरोपींने तिच्यावर बलात्कार केला, असे फिर्यादीत म्हटले आहे.

## तांदुळवाडी जागेच्या कारणावरून मारहाण

**सोलापूर** : तांदुळवाडी (ता.माळशिरस) येथील सिध्दनाथ मंदिराजवळ जागेच्या कारणावरून काठी तसेच लाथा बुक्क्यांनी केलेल्या मारहाणीत आनंद रामचंद्र गुरव (वय ४० रा.तांदुळवाडी) हे जखमी झाले. ही घटना शनिवारी दुपारच्या सुमारास घडली.

प्रकरणात वेळापूरच्या पोलिसांनी खंडू शहाजी कर्नवर आणि शहाजी दादू कर्नवर (रा.तांदुळवाडी) या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला. जखमी आनंदराव गुरव हे मंदिराजवळच्या आपल्या जागेत बांधकाम करीत होते.

## मतमोजणीवेळी मोबाइलला प्रतिबंध



**सोलापूर** : सोलापूर व माढा लोकसभा मतदार संघाची मतमोजणी मंगळवारी शासकिय रामवाडी गोदामात होणार असून त्या परिसरात मोबाईल, टॅब लॅपटॉप आदी संदेशवाहक उपकरणे नेण्यावर बंदी घातली आहे. तसेच निवडणूक कार्याकयाकडून परवानगीशिवाय वाहने नेण्यास मानाईचा आदेश पोलिस आयुक्त एम राजकुमार यांनी दिले.

मतमोजणी केंद्रापासून शंभर मीटर परिसरात मोबाईल, कॉर्डलेस फोन, पेजर, वायरलेस सेट, ध्वनीक्षेपके व इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणे (संपूर्ण मतमोजणी प्रक्रियेचे अधिकृत रेकॉर्डिंगसाठी वापरले जाणारे कॅमेरे वगळता) यांच्या वापरासाठी, निवडणुकीच्या कामाव्यतिरिक्त खासगी वाहन व मतमोजणीच्या कामाव्यतिरिक्त इतर व्यक्तींस प्रवेश करण्यासाठी मनाई करण्यात आली आहे. मतमोजणी केंद्रापासून १०० मीटरच्या आतमधील क्षेत्र हे पादचारी क्षेत्र राहील. वाहनांना प्रतिबंध करण्यात आले आहेत. हा आदेश मंगळवार ४ जून २०२४ रोजी सकाळी आठ वाजल्यापासून सायंकाळी सहा वाजेपर्यत लागू आहेत.

## श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे पदस्पर्शदर्शन सुरू

### तळघरात मिळालेल्या मुर्ती संग्रालयात जतन करणार : गहिनीनाथ महाराज औसेकर

**पंढरपूर** : गर्भगृहातील संवर्धनाचे काम आषाढी यात्रा २०२४ पूर्वी पूर्ण करायचे असल्याने १५ मार्चपासून कामास सुरुवात करण्यात आली आहे. तेव्हापासून पदस्पर्श दर्शन बंद करुन पहाटे ५ ते सकाळी ११ वाजेपर्यंत मुखदर्शन सुरु ठेवण्यात आले होते. दरम्यान सदर काम पूर्णत्वास आल्याने भाविकांसाठी रविवारपासून (दि. २) श्रींचे पदस्पर्शदर्शन सुरू करण्यात आले आहे. तसेच मंदिर समितीच्या वतीने श्रींची पहाटे ४ वाजता नित्यपुजा संपन्न झाली.

या पुजेस पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील, आ. बबनदादा शिंदे, आ.समाधानदादा आवताडे मा.आ. प्रशांत परिचारक, मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, मंदिर समितीचे सदस्य, सल्लागार परिषदेचे सदस्य, वारकरी संघटनेचे प्रतिनिधी तसेच पत्रकार उपस्थित होते. श्रींची नित्यपुजा झाल्यानंतर पदस्पर्शदर्शन रांगेतील बालाजी व सरस्वती मनोहर मुंडे (रा. मनुर, जि. अदिलाबाद) ह्या प्रथम भाविक दाम्पत्यांना श्रींचे पदस्पर्शदर्शन घडवून पदस्पर्शदर्शनाची सुरवात करण्यात आली.

या बैठकीस सदस्या शकुंतला नडगिरे, डॉ.दिनेशकुमार कदम, संभाजी शिंदे, भास्करगिरी गुरू किसनगिरी बाबा, ॲड.माधवी निगडे, ह.भ.प. ज्ञानेश्वर देशमुख जळगांवकर, ह.भ.प. प्रकाश जवंजाळ, ह.भ.प. शिवाजीराव मोरे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके व व्यवस्थापक बालाजी पुदलवाड उपस्थित होते.

### बैठकीतील निर्णय...

आषाढी यात्रा २०२४ नियोजनाबाबत सकाळी साडेनऊ वाजता सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. यात आषाढी यात्रेत भाविकांना देण्यात येणाऱ्या सोयी सुविधांचा आढावा घेण्यात आला. त्यामध्ये दर्शनरांगेचे व्यवस्थापन चांगल्या पध्दतीने करून संबंधित सर्व कामे वेळेत पूर्ण करण्याच्या सुचना औसेकर महाराज यांनी प्रशासनास दिल्या. तसेच मंदिरातील संवर्धन काम करतेवेळी हनुमान गेट येथे मिळालेल्या तळघरातील मुर्ती संग्रालयात जतन करून ठेवणे व तळघराच्या ठिकाणी माहितीची कोनशीला बसवण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच दर्शनरांगेतील कायमस्वरूपी पत्राशेडची दुरूस्ती करून नव्याने २ कायमस्वरूपी पत्राशेड उभारण्याचे ठरले.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आपण तयारीत असलेलं बरं!

